नि.दि.दा. क्र. ४०/२०१८
अब्दुल अजीस -वि- अब्दुल सईद व इ.
नि.क्र. ४६

## नि. क्र. ४६ वर आदेश

**१.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश २६ नियम १ नुसार साक्षीदाराच्या साक्ष तपासणी कामी कोर्ट कमिशनर नियुक्ती करिता दाखल केलेला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे साक्षीदार नामे – म. मोसिन म. हनिफ हे वयोवृध्द व विविध आजाराने ग्रस्त असल्यामुळे ते अंथरुणावर पडून आहे. त्यामुळे त्यांना सदर दाव्यात साक्ष देण्याकामी हजर राहता येणार नाही. तसेच सदर साक्षीदार हे त्यांचे महत्त्वाचे साक्षीदार असल्यामुळे, सदर साक्षीदाराचा तोंडी पुरावा नोंदविण्याकरिता कमिशनरची नियुक्ती करण्याची विनंती वादी यांनी केलेली आहे.

२. सदर अर्जास प्रतिवादी यांनी खुलासा दाखल करुन असे नमूद केले आहे की, वादी यांनी सदर साक्षीदाराचा उल्लेख यापूर्वी दाव्यात कुठेही केलेला नसून सदर साक्षीदाराच्या आजारपणाबाबत त्यांनी कुठलाही वैद्यकीय पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

३. प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील लेखी खुलासा व अभिलेखाचे अवलोकन केले. तसेच दोन्ही पक्षकारांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तुत दावा वादी यांनी वादातील खरेदीखत त्यांच्यावर बंधनकारक नसल्याचे जाहिर करुन मिळण्याकरिता व दावा मिळकतीचा ताबा व दरम्यानचा नफा मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. तसेच सदर दावा आज रोजी वादीच्या पुढील पुराव्याकरिता प्रलंबित आहे. प्रस्तूत अर्जातील मागणीचा विचार करुन सदर अर्जाच्या समर्थनार्थ संबंधीत साक्षीदाराचे वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल करण्याबाबत अर्जदाराच्या विद्वान वकिलांना सूचित केले होते. परंतु पुरेसी संधी देऊन देखील त्यांनी कुठलेही वैद्यकीय दस्तऐवज दाखल केलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदार हे विविध आजाराने ग्रस्त व न्यायालयात साक्ष कामी हजर राहण्यास असमर्थ आहे, हे प्रथमदर्शी दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तूत अर्ज मंजूर करता येणार नाही. करिता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

प्रस्तूतचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

BHARAT SANTARAM JAGDALE
Digitally signed by BHARAT SANTARAM JAGDALE
Date: 2024.08.05 17:53:04 +0530

दि. ०५/०८/२०२४

(भरत सं. जगदाळे)
दिवाणी न्यायाधीश क–स्तर, दिग्रस